Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक २] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ९-१५, २०२०/पौष १९-२५, शके १९४१ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २.

### जिल्हाधिकारी, यांजकडून

**आदेश**

क्र.-कक्ष-२०-नविशा-कावि-१५६०-२०१९.—

महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमाच्या १९६५ चे कलम ५१-अ-१अ (९) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१९-प्र.क्र.११-का-६, दिनांक २९-११-२०१९ प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, शैलेश नवाल (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, अमरावती या प्रगटणाद्वारे जाहिर करितो की, दिनांक २९-१२-२०१९ रोजी अमरावती जिल्ह्यातील मोर्शी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदासाठी घेण्यात आलेल्या अध्यक्ष पोट-निवडणुकीत खालील अनुसूचीत स्तंभ (२) मध्ये दर्शविलेल्या नगरपरिषदेत त्यांच्या नावासमोर स्तंभ (३) मध्ये नमूद केलेले उमेदवार अध्यक्ष म्हणून निवडून आलेले आहेत.

| अ. क्र. | नगर परिषदेचे नाव | निवडून आलेल्या अध्यक्षाचे नाव | जागा राखीव असेल तर त्याचा प्रवर्ग |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | मोर्शी | मडघे मेघना मोहन | सर्वसाधारण (महिला) |

अमरावती :

दिनांक ३१ डिसेंबर २०१९.

**शैलेश नवाल** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, अमरावती.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-20L.F.A.K.-Ele-W.S.-1560-2019.—

In exercise of the powers under Section 51-A-A1(9) of the Maharashtra Municipal Councils, *Nagar Panchayat* & Industrial Townships Act, 1965. I, Shailesh Nawal (I.A.S.), Collector, Amravati hereby published Name of President of Nagar Parishad Morshi for which the election has been held on date 29-12-2019 (Sunday) as shown below schedule in Col. No.(3) is elected for the Nagar Parishad shown in Col. No. (2).

SCHEDULE

| Sr. No. | Name of Municipal Council | Name of President elected | Whether the seat is reserved if so, for which category |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Morshi | Madghe Meghna Mohan | General (women) |

Amravati :
Dated the 31st December 2019.

SHAILESH NAWAL (I.A.S.),
Collector, Amravati.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ४.

## संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

क्र.डि.टी.पी.-वि.यो.मोर्शी (वा.ह.)-कलम-१२७(२)-अधिसूचना-टिपीव्ही-६-६२९२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम ३१(१) अन्वये मोर्शी या "क" वर्ग नगर परिषदेच्या वाढीव हद्दीची विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली) शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस-२८०३-१६९८-प्र.क्र.३७७(बी)-२००३-नवि-३०, दिनांक ११ जुलै २००५ अन्वये भागशः मंजूर केली आहे व ती दिनांक १ सप्टेंबर २००५ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे " उक्त विकास योजना" असे संबोधिलेले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजे दुर्गवाडा, ता. मोर्शी स.नं. ७/२ मध्ये ०.३४ हे. क्षेत्र आ.क्र. २२ "दुकान केंद्र" व २.६१ हे. क्षेत्र आ.क्र. २३ बगीचा (यापुढे "उक्त आरक्षणे" असे संबोधिलेले आहे.) यासाठी प्रस्तावित करण्यात आले असून, त्यासाठी समुचित प्राधिकरण नगर परिषद, मोर्शी आहे. (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरण यांनी विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या कालावधित उक्त आरक्षणाखालील जागेचे संपादन केलेले नाही;

आणि ज्याअर्थी, मौजे दुर्गवाडा, ता. मोर्शी, स.नं. ७/२ मधील २.९८ हे. जागेचे मालकांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या अर्जान्वये मोर्शी नगर परिषदेवर, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वयेची सूचना बजावली होती (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधिलेले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) अन्वयेची सूचना प्राप्त झाल्यापासून चोवीस महिन्यांच्या कालावधीत उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त आरक्षणांखालील जागा संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने, उक्त जमिनीच्या मालकांनी दाखल केलेल्या सिव्हील अपिल क्र. ६६६१/२०१९ मध्ये दि. २७ ऑगस्ट २०१९ च्या आदेशान्वये उक्त आरक्षणे जमीन मालकांच्या जागेपुरती कलम १२७ मधील तरतुदीनुसार व्यपगत झाल्याचे आदेश पारित केले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) नुसार उक्त आरक्षणे भागशः व्यपगत झाली असून, उक्त अधिनियमाच्या कलम १२७(२) नुसार उक्त जागेचे क्षेत्रापुरते उक्त आरक्षणे भागशः व्यपगत झाल्याबाबत अधिसूचना निर्गमित करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र. ५०८-नवि-१३, दिनांक १ जानेवारी २०१६ अन्वये सर्व नगरपालिका/नगर पंचायती आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण असलेल्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ पोट-कलम (२) अन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ चे उपकलम (२) बाबत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारात संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, हे या अधिसूचनेन्वये मोर्शी शहराच्या उक्त विकास योजनेतील आ.क्र. २२ “दुकान केंद्र” व आ. क्र. २३ “बगीचा” ही आरक्षणे उक्त जागेपुरती (खालील परिशिष्टात विस्तृतपणे नमूद केल्याप्रमाणे) भागशः व्यपगत झाल्याबाबत अधिसूचित करीत असून, सदर मुक्त झालेली जागा, लगतच्या जमिनीवर उक्त विकास योजनेनुसार अन्यथा अनुज्ञेय होणा-या विकासाच्या प्रयोजनासाठी, जमीन मालकांस विकासाकरिता उपलब्ध होईल.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | मौजे, तालुका व जिल्हा | विकास योजनेतील आरक्षणे व वि. यो. अहवालानुसार क्षेत्र | सूचनेखालील ग.नं./ स.नं. | उक्त सूचनेमध्ये नमूद आरक्षणातून व्यपगत झालेल्या भागाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | मौजे दुर्गवाडा, ता. मोर्शी, जि. अमरावती. | आ.क्र. २२ “दुकान केंद्र” क्षेत्र ०.३४ हे. व आ.क्र. २३ “बगीचा” क्षेत्र २.६१ हे. | स.नं. ७/२ | भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे (भागशः) |

उक्त आरक्षणातून व्यपगत झालेले क्षेत्र दर्शविणा-या भाग नकाशाची प्रत मुख्याधिकारी, मोर्शी नगर परिषद यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत ठेवण्यात येत आहे.

सदर आदेश संचालनालयाच्या संकेतस्थळावर *www.dtp.maharashtra.gov.in* देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे :
दिनांक : २४ डिसेंबर २०१९.

**नो. र. शेन्डे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

---

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ५.

DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.—

No. D.T.P-D.P.Morshi (A.A.)-Sec-127(2)-Notification-TPV-VI-6292.—

Whereas, the Government of Maharashtra Urban Development Department *vide* its Notification No. TPS-2803-1698-C.R. 377(B)-2003-UD-30, Dated 11th July, 2005 has sanctioned the Development Plan of Additional Area of “C” class Municipal Council, Morshi partly (hereinafter referred to as the “said Development Plan”) under Section 31(*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as “the said Act”) and the same has come into force with effect from date 1st September, 2005;

And whereas, in the said Development Plan, the land admeasuring 0.34 Ha. & 2.61 Ha., from S. No. 7/2 of Mouza Durgwada, Taluka Morshi is reserved for “Site No. 22-Shopping Centre” & “Site No. 23 - Garden” respectively (hereinafter referred to as “the said Reservation”); for which Appropriate Authority is Municipal Council, Morshi (hereinafter referred to as “the said Appropriate Authority”);

And whereas, the land under said reservations has not been acquired by the said Appropriate Authority within ten years from the date on which the said Development Plan came into force;

And whereas, the owners of 2.98 Ha. land from S. No. 7/2 of Mouza Durgwada, Taluka Morshi had served a Notice under Section 127(*1*) of the said Act on the Chief Officer, Municipal Council, Morshi *vide* their letter dated 31st August, 2015 (hereinafter referred to as "the said Notice");

And whereas, the said Appropriate Authority, has not acquired the land under the said Reservations under Section 127(*1*) of the said Act, within a period of twenty four months from the date of receipt of the said notice;

And whereas, the Hon'ble Supreme Court in Civil Appeal No. 6661 of 2019 filed by the owners of the said land has passed the order dated 27th August 2019, that the said reservations to the extent of the said land have been lapsed under Section 127 of the Said Act;

And whereas, in accordance with the provision of Section 127(*1*) of the said Act, the part of the said Reservations, pertaining to the said land has lapsed and it is accordingly expedient to notify such lapsing under Section 127 (*2*) of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department under Section 151 of the said Act, *vide* Resolution No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 1st December 2016, has delegated the powers exercisable by its under Section 127(*2*) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils/*Nagar Panchayat* and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, in exercise of the powers delegated by the Government, in respect of Sub-section (*2*) of Section 127 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, hereby notifies that the said Reservations of "Site No. 22-Shopping Centre" & "Site No. 23 - Garden" in said Development Plan of Morshi is lapsed partly only in respect of said land (as specified in the schedule herein below) and the said land shall become available to the land owners for the purpose of Development as otherwise, permissible in the case of adjacent land, under the said Development Plan;

SCHEDULE

| Sr. No. | Mauja, Taluka & District | Reservations of Development Plan & its Area as per D.P. | Survey No./Gut No. under notice | Area of the lapsed part of the reservations as mentioned in the said notice |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | Mauja Durgwada, Taluka-Morshi, Dist. Amravati | "Site No. 22- Shopping Centre" Area 0.34 Ha. & "Site No. 23-Garden" Area 2.61 Ha. | S. No. 7/2 | As Shown on Part Plan (Partly) |

A copy of the part plan showing the area which is lapsed from the said reservations, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Morshi during office hours on all working days for inspection to public upto one month.

This Order shall also be published on the Directorate website www.dtp.maharashtra.gov.in.

Pune :
Dated the 24th December 2019.

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.